**अतितात्काळ/कालमर्यादा/महत्वाचे**

क्र.पोमसं/३१/२२३५/ठेसंवियो/२०२२-२०२३/२२७/२०२२ मुंबई दि. ३१/०३/२०२३

संदर्भ- शासन निर्णय, गृह विभाग क्र. -बीयुडी-०६२२/प्र.क्र.११३आस्था-१ दि ३ मार्च, २०२३

विषय-**लेखा अनुदान २०२२-२०२३**
मागणी क्र. बी-६, मुख्य लेखाशिर्ष २२३५,
सामाजिक सुरक्षा व कल्याण, १०४ ठेव संलग्न विमा योजना.

**---आदेश---**

शासन निर्णय, गृह विभाग क्र. -बीयुडी-०६२२/प्र.क्र.११३आस्था-१ दि ३ मार्च, २०२३ अन्वये सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षाकरिता मागणी क्र. बी-०६, मुख्यलेखाशिर्ष "२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण" १०४- ठेव संलग्न विमा योजने अंतर्गत मृत शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या वारसदारांना अनुदान मंजुर करण्याकरिता शासनाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना १,४०,००,०००/- (अक्षरी रु. एक कोटी चाळीस लाख फक्त) इतका निधी चिन्हांकित करुन स्वतंत्रपणे अर्थ संकल्पीय संगणकीय वितरण प्रणालीद्वारे (BDS) वाटपासाठी उपलब्ध करुन दिलेला आहे. सदर शासन निर्णयाची प्रत सोबत जोडलेली आहे.

२. उपरोक्त शासन निर्णयान्वये शासनाने चिन्हांकित करुन दिलेली रक्कम १,४०,००,०००/- (अक्षरी रु. एक कोटी चाळीस लाख फक्त) इतक्या निधीमधून या कार्यालयाच्या प्रतीक्षायादीवरील २३३ संबंधित मृत अधिकारी/कर्मचा-यांच्या वारसदारांना सोबत जोडलेल्या यादीनुसार **रु १,३९,८०,०००/- (अक्षरी रु. एक कोटी एकोणचाळीस लाख ऐंशही हजारा फक्त)** इतके अनुदान वाटप करण्यात आले आहे. तद्नंतर काही कारणास्वत घटक कार्यालयाने परत केलेली एकुण १,२०,०००/- (अक्षरी एक लाख वीस हजार) इतक्या निधीमधून या कार्यालयाच्या प्रतीक्षायादीवरील खालीप्रमाणे नमुद केल्याप्रमाणे अनुदान मंजुर करण्यात येत आहे. ठेव संलग्न विमा योजनेअंतर्गत अनुदान मंजुरीचे प्राधिकार क्षेत्रीय कार्यालय प्रमुखांना प्रदान करण्यात आलेले असल्यामुळे, खालील नमुद घटक कार्यालयास अनुदान वाटप करण्यात येत आहे. खालील नमुद घटक प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील मृत अधिकारी/कर्मचा-यांच्या वारसदारांचे अनुदान मंजूरीचे आदेश तात्काळ निर्गमित करुन त्याची प्रत या कार्यालयास पाठवावी.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | मयत अधिकारी/कर्मचाऱ्याचे नांव | मृत्यू दिनांक | वारसदारांचे नाव | भ.नि.नि.खाते क्र. | महालेखापालांचा पत्र क्रमाक व दिनांक | अनुज्ञेय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | महासंचालक व संचालक, दळणवळण परिवहन, म. राज्य, पुणे | अरिफ चाँद बेग, काशि | १२-०६-२२ | श्रीमती- शाहिन पत्नी | डीपीडब्लु-९८ | क्र. लशा-२/मयत बेग/ठेव संलग्न विमा योजना/४८३/२०२३ दि ०१/०२/२०२३ | ६०००० |

| | |
|---|---|
| **एकुण ठेव संलग्न विमा योजना खर्चित अनुदान (अक्षरी रुपये फक्त)** | **६००००** |
| **एकुण ठेव संलग्न विमा योजना मंजुर अनुदान** | **१४००००००** |
| **सदर आदेश निर्गमित करण्यापुर्वी ठेव संलग्न विमा योजने अंतर्गत मंजुर करण्यात आलेले मागील अनुदान** | **१३९८००००** |
| **मागील आदेश निर्गमित केल्यानंतर ठेव संलग्न विमा योजने अंतर्गत शिल्लक अनुदान** | **२२०२१** |
| **घटक कार्यालयातुन परत करण्यात आलेले अनुदान** | **१२००००** |
| **शिल्लक ठेव संलग्न विमा योजना अनुदान** | **८२०२१** |

३. शासनाने सदर शासन निर्णयान्वये चिन्हांकित करुन दिलेला निधी दि ३१/०३/२०२३ पर्यंत कोणत्याही परिस्थितीत खर्च होणे आवश्यक आहे. सदर निधीचा विनियोग पुर्णत: न केल्यास किंवा व्यपगत झाल्यास त्याची सविस्तर कारणे शासनास व लोकलेखा समितीस सादर करावी लागतात याची कृपया नोंद घ्यावी. तरी संबंधित

कोषागार कार्यालयास त्यासंबंधीची अचूक देयके सादर करावीत व ती देयके कोणत्याही परिस्थिती दि ३१/०३/२०२३ पूर्वी पारित करुन घ्यावीत. तसेच, संबंधित मृत अधिकारी/कर्मचा-यांच्या वारसदारांना रक्कम अदा करणे ही, सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधित घटक प्रमुखाची असल्यामुळे, सदर प्रकरणांची तातडी व गांभीर्य लक्षात घेऊन या प्रकरणी स्वत: लक्ष देऊन, त्यांचे कार्यालयातील लिपीक वर्गीय अधिकारी/कर्मचा-यांना त्याप्रमाणे विहीत कालावधीत अचूक व परिपुर्ण कामे करण्याबाबत सक्त सूचना द्याव्यात, जेणेकरुन शासनाने चिन्हांकित करुन दिलेल्या निधीचा विनियोग पुर्णत: होईल. संबंधित वारसदारांना अनुदान अदा केल्यानंतर त्यांची दिनांकित अदा **रोल पावती देयकाच्या कोषागार प्रमाणपत्र क्रमांक दिनांकासह शासनास व महालेखापाल-१, मुंबई /महालेखापाल-२, नागपूर तसेच या कार्यालयास दिनांक १०/०४/२०२३ पूर्वी न चुकता सादर करावी.**

४. असेही निर्देश देण्यात येते आहेत की, उपलब्ध करुन दिलेल्या वरील रकमेच्या खर्चाचा ताळमेळ, महालेखापाल यांचे तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करुन त्याबाबतची प्रमाणित माहिती शासनास विहीत मुदतीत पाठविण्यात यावी. त्यानुसार शासनाने चिन्हांकित करुन दिलेल्या निधीनुसार, या कार्यालयाने मंजूर केलेल्या अनुदानाच्या खर्चाबाबतचा ताळमेळ संबंधित कोषागार कार्यालय व महालेखापाल यांचे कार्यालयातील नोंदविलेल्या खर्चाशी करुन खर्चमेळाची प्रमाणित माहिती दिनांक १०/०४/२०२३ पुर्वी महालेखापाल यांचे कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची **संपुर्ण जबाबदारी ही क्षेत्रीय कार्यालय प्रमुखांची राहील त्याप्रमाणे माहिती न पाठविणा-या कार्यालयातील संबंधितावर जबाबदारी निश्चीत करुन कारवाई करणे भाग पडेल याची कृपया नोंद घ्यावी. प्रमाणित न केलेली माहिती स्विकारण्यात येणार नाही व या कारणामुळे विलंब झाल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग/ कार्यालय प्रमुखांची राहील.**

५. तसेच सदरचा खर्च हा सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षातील, गृह विभाग, मागणी क्र. बी-६ मुख्यालेखाशिर्ष "२२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण" गौणशिर्ष-१०४ ठेव संलग्न विमा योजना (सांकेतिक क्रमांक २२३५१६८४) या लेखाशिर्षाखली खर्ची टाकण्यात यावा व तो वित्तीय वर्ष २०२२-२०२३ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. तसेच सदरचा खर्च हा याच लेखाशिर्षाखाली नोंदविला गेला आहे, याची खातरजमा करण्याची कृपया नोंद घ्यावी.

**(अनुप कुमार सिंह)**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

महासंचालक व संचालक, दळणवळण परिवहन, म. राज्य, पुणे